सिडको संचालक मंडळावर शासनाकडून संचालक पदी नियुक्त करण्यात येणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती पदसिध्द पध्दतीने करण्याबाबत......

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक : सिआयडी-१०१४/प्र.क्र.११/नवि-१०
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ५ जुलै, २०१४.

प्रस्तावना :-

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (मर्यादित) महाराष्ट्र (सिडको) यांच्या आर्टिकल ऑफ असोसिएशन मधील आर्टिकल २०२ (i) मध्ये राज्य शासनाकडून केंद्र शासन / राज्य शासन / महामंडळ यांच्या सेवेतील काही पदांवरील व्यक्तींची ते धारण करीत असलेल्या पदाच्या अनुषंगाने सिडको संचालक मंडळावर संचालक म्हणून नेमणूकीसंबंधीची तरतुद अंतर्भूत असून राज्य शासनाकडून अशा व्यक्तींची प्रकरणपरत्वे नियुक्ती करताना ती त्यांच्या नावाने करण्यात येते. त्यामुळे संबंधीत अधिका-यांची बदली झाल्याने किंवा सदर अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने वा अन्य कारणाने रिक्त होणा-या संचालक पदी नव्याने नियुक्ती करताना प्रत्येकवेळी स्वतंत्र शासन आदेश निर्गमित करावे लागतात. सदर प्रक्रिया वेळखाऊ असल्याने सिडको संचालक मंडळावरील संचालकांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुलभ करण्याच्यादृष्टीने सिडको संचालक मंडळाने ठराव क्र. १०८१२, दि. १७.५.२०१३ अन्वये शासन सेवेतील संचालकांची पदसिध्द पध्दतीने नियुक्ती करण्याबाबतच्या सुधारित रचनेस मान्यता देऊन आर्टिकल ऑफ असोसिएशन मधील आर्टिकल २०२ (i) मध्ये त्यानुसार सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. सिडकोच्या सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विचारांती शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

सिडकोच्या आर्टिकल ऑफ असोसिएशन मधील आर्टिकल २०२ (i) च्या तरतुदीत सिडको यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारणा न करता आर्टिकल २०२(i) च्या विद्यमान तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासनास असलेल्या अधिकारान्वये पुढील आदेश होईपर्यंत सिडको संचालक

मंडळावरील संचालक - १ ते संचालक - ६ या पदावर पुढील तक्त्यामध्ये दर्शविलेले शासकीय अधिकारी यांची पदसिध्द पध्दतीने संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | संचालक मंडळामधील पद | पदसिध्द अधिकारी |
|---|---|---|
| १ | संचालक-१ | प्रधान सचिव (नगर विकास-१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन |
| २ | संचालक-२ | प्रधान सचिव (नगर विकास-२), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन |
| ३ | संचालक-३ | अध्यक्ष, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट |
| ४ | संचालक-४ | महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ५ | संचालक-५ | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन |
| ६ | संचालक-६ | आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१४०७०५११२१५३९९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

(एस. के. सालीमठ)
शासनाचे उप सचिव

प्रत,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (विधी व न्याय), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
अध्यक्ष, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको), नरिमन पॉईन्ट, मुंबई-४०० ०२१.
विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका
निवड नस्ती (नवि-१०).

******

D:\2014\CR-11-14-Amend Art 202.doc